# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी,
पनवेल -४१०२०६

दुरध्वनी कार्यालय: ०२२- २७४५८०४०/४१/४२
उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com

फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/ २०६२ /सन २०२०-२१

दिनांक:- १२ /०७/२०२०

## जाहिरात

विषय: कोरोना विषाणू (कोव्हिड १९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी कंत्राटी भरती करीता जाहिरात.

कोरोना विषाणू (कोव्हिड १९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता पनवेल महानगरपालिका क्षेत्रात काम करण्यासाठी याद्वारे इच्छुक उमेदवारांकडुन खालील नमूद पदासाठी, नमूद कालावधी करिता पात्र उमेदवारांकडुन Online अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पद नाम | शैक्षणिक अर्हता | एकुण पदांची संख्या | मासिक ठोक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | फिजिशीयन(भिषक) | M.B.B.S. , M.D. (Medicine) | ०५ | रु. १,५०,०००/- |
| २ * | पार्टटाईम फिजिशीयन (अंशकालीक / भिषक) | M.B.B.S. , M.D. (Medicine) | ०३ | रु. १,००,०००/- |
| ३ | भुलतज्ञ | M.B.B.S. + Degree / Deploma in Anaesthesia | ०५ | रु. १,२०,०००/- |
| ४ | वैद्यकीय अधिकारी | M.B.B.S. | २० | रु. ८०,०००/- |
| ५ | वैद्यकीय अधिकारी (आयुष) | B.A.M.S / B.H.M.S. / B.U.M.S | ५० | रु. ५०,०००/- |
| ६ | अधिपरिचारिका | GNM / B.Sc Nursing, MNC कडील नोंदणी अनिवार्य | ३० | रु. २५,०००/- |
| ७ | आरोग्य सेविका | H.S.C. आणि मान्यता प्राप्त संस्थेतील ऑक्झिलरी मिडवाईफ नर्सिंग कोर्स पुर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल नोंदणी आवश्यक | ५० | रु. २०,०००/- |
| ८ | फार्मासिस्ट | D.Pharma / B.Pharma | ०५ | रू.२०,०००/- |

* **टिप** : फिजिशीयन (भिषक), एम.डी.(मेडिसीन) यांच्या उपलब्धतेची मर्यादा विचारात घेऊन उपजिल्हा रूग्णालय किंवा ५० हून अधिक बेडची व्यवस्था असलेल्या शासन अथवा महानगरपालिकेच्या रूग्णालयात दाखल रूग्णांची दररोज एकवेळ तपासणी व तातडीच्या प्रसंगी ऑनकॉल १२ तास उपलब्धता यासाठी एकूण ३ पदांसाठी इच्छूकता मागविण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

**अटी व शर्ती-**

१. उपरोक्त पदांकरिता कालावधी ६ महिने किंवा कोरोना (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तो पर्यंत असेल.
२. रूग्ण तपासणी करणे तसेच कोव्हिड केअर सेंटर, कोव्हिड रूग्णालय येथे तैनात राहून सेवा देणे बंधनकारक राहील या अटीवर कंत्राटीस्वरूपात नेमणूक करण्यात येत आहे. कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास सदर पदावरील व्यक्तीची सेवा कोणतीही पुर्वसुचना वा कोणतेही कारण न देता संपुष्टात आणली जाईल.
३. संशयास्पद सचोटी, गैरवर्तणूक / अशोभनीय वर्तन, वरिष्ठांची दिशाभूल करणे, गैरहजर राहणे, आदेशाचे पालन न करणे याबाबत कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा संपुष्टात आणली जाईल.
४. उमेदवाराला नियुक्तीनंतर राजीनामा द्यावयाचा असल्यास किमान १५ दिवसांची लेखी नोटीस द्यावी लागेल. अन्यथा त्या महिन्याचे मानधन अदा केले जाणार नाही.
५. उपरोक्त पदांकरिता दरमहा एकत्रित ठोक मानधन देण्यात येईल. पदांची संख्या आवश्यकतेनुसार कमी किंवा जास्त करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.
६. क्षेत्रीयस्तरावर सामाजिक बांधिलकीने काम करण्याची आवड असावी.
७. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य राहिल. याबाबत आयुक्तांचा निर्णय अंतिम राहिल.
८. सदरची नेमणुक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यात येणार आहे. सबब, मुलाखत होणार नसल्याने प्रत्यक्ष येऊ नये. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यात येऊ नये.
९. जिल्हा सीमा बंद असल्याने व सार्वजनिक वाहतुक व्यवस्था बंद असल्याने उमेदवार हा पनवेल महानगरपालिका क्षेत्रात राहणारा असावा.
१०. panvelcorporation@gmail.com या ईमेलवर संबधितांनी अर्ज करावा. अर्जाची अंतिम मुदत दिनांक२२/०७/२०२० सांयकाळी ५ वाजेपर्यंत आहे. तद्नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**मा.आयुक्त यांचे मान्यतेने:**

(जमीर लेंगरेकर)
उप आयुक्त-I (मु.)
पनवेल महानगरपालिका

Scanned with CamScanner